# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५**

## गृहनिर्माण विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २०**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: क्यू-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१६, गृहनिर्माण**<br>**रूपये:- २२,७०,६३,५५,०००/-**<br>**श्री. अजय चौधरी** |
| (१) | ४५७ | १०० | मुंबईतील विकास नियंत्रण प्रोत्साहनात्मक नियमावलीतील ३३(१०) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविली जाते. परंतु खरेदी-विक्री व्यवहार केलेल्या झोपडीधारकाला पात्र ठरविण्यात येत नाही. त्यामुळे अनेक झोपडीधारक घरापासून वंचित राहतात. झोपडपट्टी पुनर्वसन योजना सुरू होण्यापुर्वी खरेदी-विक्री व्यवहार केलेल्या झोपडी धारकाच्या व्यवहारास मान्यता देऊन खरेदी करण्यास पात्र ठरवून परिशिष्ट-२ मध्ये त्यांच्या नावाचा समाविष्ट करण्यासंदर्भात शासनाने निर्णय घ्यावा व त्याची अंमलबजावणी करावी.याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनंत (बाळा) नर** |
| (२) | १६६ | १०० | जोगेश्वरी पुर्व येथील गुंफा परिसरात गत ५० वर्षापासून अस्तित्वात असलेल्या जयंत चाळीचा झोपडपटटी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता विकासकामार्फत सन २००४ मध्ये निष्कासन करण्यात येणे, सन २००५ मध्ये झोपडीधारकांसमवेत करार होणे, या परिसरातील जयंत चाळ ,पुष्कर्ण ब्राम्हण वाडी या चाळी गुंफेच्या केंद्रबिंदूपासून २५ मीटरच्या क्षेत्रात येत असल्याने यापैकी जयंत चाळीच्या पुनर्विकासाबाबत अदयाप कोणतीच कार्यवाही सुरु झालेली नसणे, याठिकाणी महानगरपालिकेतर्फे सर्व्हेक्षण करण्यात आले त्योवळी घरे अगोदरच निष्कासित केलेली आल्यामुळे व तेथे १८ रहिवाशी राहत नसल्याने त्यांचे सर्व्हेक्षण करण्यात आले नाही .त्यामुळे या १८ रहिवाश्यांना पात्र ठरविण्यात न आल्यामुळे सध्यस्थितीमध्ये १८ रहिवाशी बेघर झालेले असणे. गेली ५० वर्षे राहत असलेल्या रहिवाश्यांचे केवळ सर्व्हेक्षण न झाल्यामुळे त्यांच्यावर बेघर होण्याची आलेली वेळ.रहिवाश्यांवर होत असलेला अन्याय ,जयंत चाळीमधील पात्र रहिवाशांकरिता गुंफेच्या केंद्रबिंदूपासून १०० मीटर क्षेत्राबाहेर म्हाडाच्या माध्यमातून पुनर्विकास योजना राबवून सदनिका उपलब्ध कराव्यात अथवा चाळीतील पात्र झोपडीधारकांना पीएपी च्या माध्यमातून हक्काच्या सदनिका उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३) | १६९ | १०० | जोगेश्वरी विधानसभा कार्यक्षेत्रातील अंधेरी पी.एम.जी.पी कॉलनी,पुनम नगर या म्हाडा वसाहतीमधील इमारत क्रमांक १ ते १७ धोकादायक इमारतींचा पुनर्विकास विकासकाच्या नेमणूकी अभावी अनेक वर्षापासून रखडलेला असणे, सदरहू अतिधोकादायक इमारतीत रहिवाशी जीव मुठीत घेऊन वास्तव्य करित असणे, विकासकाला १ ते १७ इमारतीचा विकास एकत्रित करण्याकरिता तीन वेळेस देकार पत्र देण्यात येणे,म्हाडा प्राधिकरणामार्फत सलग दोन वेळेस निविदा प्रक्रिया राबविण्यात येणे तसेच पुनर्विकासाबाबत सभागृहात विविध आयुधांद्वारे चर्चा होऊनही कोणतेच आदेश अदयाप पारित न होणे,उक्त इमारती अतिधोकादायक असल्याबाबत अहवाल शासनास प्राप्त होणे, सदर इमारतीच्या पुनर्विकामासंदर्भात तत्कानिक मंत्री,संबंधित अधिका-यांसमवेत यापूर्वी अनेकदा बैठका झालेल्या असणे, वर्षानुवर्षे इमारतीचा पुनर्विकास रखडलेला असल्याने रहिवाश्यांमध्ये शासनाप्रतीनिर्माण झालेली संभ्रमाची भावना, अंधेरी पी.एम.जी.पी कॉलनीतील १ ते १७ धोकादायक इमारतींतील रहिवाश्यांच्या जिवीताचा गांभीर्याने विचार करुन अनेक वर्ष रखडलेला पुनर्विकास तातडीने मार्गी लावण्याकरिता सदर इमारतीचा एकत्रित पुनर्विकास करण्याकरिता तात्काळ विकासकांची नेमणूक करुन इमारतीचा पुनर्विकास तातडीने हाती घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ५९१ | १०० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदार संघामधील गोरेगांव पुर्व येथील आरे दुग्ध वसाहतीमधील संरक्षित झोपडपटटी धारकांची गणना करणे अत्यंत गरजेचे असणे, तसेच आरे दुग्ध वसाहतीमधील नैसर्गिक संपत्ती व पर्यावरण उपयुक्त असल्यामुळे त्याठिकाणी असलेल्या संरक्षित झोपडयांच्या पुनर्वसनाकरिता योजना तयार करुन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (५) | ६३२ | १० | दक्षिण मुंबईमध्ये पायधुनी, भुलेश्वर, उमरखाडी, कामाठीपुरा, नळबाजार, काळबादेवी, मोहम्मद अली रोड हा परिसर सतत गजबजलेला असणे, या परिसरात अनेक जुन्या व जीर्ण इमारती असणे, येथील परिसरात इमारती कोसळण्याचे प्रकार घडत असणे, या जुन्या व जीर्ण इमारतींमधील रहिवाशी जीव मुठीत घेऊन रहाणे, या परिसरातील अनेक इमारती या अतिशय जुन्या झाल्या असल्याने या भागात दरवर्षी दुर्घटना घडून अनेक लोकांचे मृत्यू होत असणे, प्रशासनाच्या दुर्लक्षितपणामुळे येथील अनेक जुन्या इमारतीत बेकायदा बांधकामे आढळून येणे , यामुळे शासनाने येथील इमारतींचे सर्वेक्षण करून व बेकायदा बांधकामे तपासून येथील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याची गरज निर्माण झालेली असणे, याप्रकरणी संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी शासनाकडून मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यास विलंब होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (६) | ६४७ | १० | मुंबई वरळी येथील सावली इमारतीतील पात्र शासकीय कर्मचाऱ्यांना वरळी बी.डी.डी. चाळ पुर्नविकासामध्ये बांधकाम दर आकारुन गाळे वितरित करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला असणे, शासन निर्णयानंतर सावली इमारतीतील १८ पात्र कर्मचाऱ्यांना सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ०९.०३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये पात्र ठरवून म्हाडाला कळविणे, म्हाडाने १८ पात्र रहिवाशांना दिनांक ०८.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये संक्रमण शिबीराचे वाटप करुन संक्रमण शिबीरात स्थलांतरीत केलेले असणे, सध्या १८ पात्र रहिवाशी सावली शासकीय इमारतीमधील सदनिकेचा ताबा सोडून गेली अडीच वर्षे संक्रमण शिबीरात राहत असणे, १८ पात्र सदनिकाधारकांची दिनांक २८.११.२०२२ रोजी नवीन प्रकल्पातील 'जी-विंग' इमारतीमध्ये म्हाडाने नियमानुसार RAT पध्दतीने सोडत काढून नविन गाळ्यांचे वाटप देखिल केलेले आहे. म्हाडाने दिनांक ०७.१०.२०२४ च्या पत्रान्वये बांधकाम दर निश्चित करण्याबाबत गृहनिर्माण विभागाला कळविलेले असून देखिल विभागाने बांधकाम दर निश्चित न करता सदरचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत निर्णय घेतलेला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय पोतनीस** |
| (७) | २३८ | १०० | मौजे कोलेकल्याण ता.अंधेरी येथील न.भू.क्र. १९० ते २६० ,२६४ ते २९६ ,२९८ ते ३७०,३७० ते ३७६,२८२ ते ४२६ या मिळकतीवरील खांडवाला एस.आर.ए को.ऑप हौसिंग सोसायटी,वाकोला, सातांक्रुझ (पूर्व) मुंबई या संस्थेमध्ये विकासक आणि खांडवाला संस्थेचे पदाधिकारी यांनी केलेला आर्थिक घोटाळा, बोगस कागदपत्रांच्या आधारे बाहेरील व्यक्तींची पात्रता करुन करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी,२०२५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस येणे, संस्थेचे सचिव,अध्यक्ष यांनी आपला नातेवाईक यांच्या नावे करुन खोटे पेपर्स सादर पात्रता करुन सदनिका घेतलेल्या असणे, कांही लोकांच्या झोपडी नसतांना खोटे रेशनकार्ड बनवून ते रेशनकाड्र पात्रतेसाठी सादर करणे, उक्त संस्थेमध्ये झालेल्या आर्थिक घोटाळयासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सक्षम प्राधिकारी-३, झो.पु.प्रा व सहायक निबंधक, सहकार कक्ष (पूर्व व पश्चिम उपनगरे) झो.पु.प्राधिकरण यांच्या माहे फेब्रुवारी, २०२३ पासून ते आजतागायत नुकतेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,झो.पु.प्रा यांच्याकडे दिनांक १३/०२/२०२५ रोजी केलला पत्रव्यवहार करãनही अदयाप कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, परिशिष्ट -२ मधील पात्रता तपासणी करण्याची आवश्यकता, परिशिष्ट-२ प्रमाणे किती रहिवाश्यांना आजपर्यंत ताबा देण्यात आला आहे याबाबत स्पष्ट खुलासा होणे गरजेचे असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (८) | २९६ | १०० | दक्षिण मुंबईतील जुन्या मोडकळीस आलेल्या धोकादायक उपकरप्राप्त इमारतीमधील हजारो मुळ भाडेकरुंची सायन प्रतिक्षा नगरातील म्हाडाच्या अखत्यारितील मुंबई इमारत दु. व पु. मंडळाच्या संक्रमण शिबिराच्या टी-६ इमारतीतील गाळयात ठेवण्यात आलेल्या मुळ कागदपत्रांच्या हजारो नस्ती वाळवीने नष्ट झाल्याचा धक्कादायक प्रकार दि.04.02.2025 रोजी उघडकीस येणे, सदरहू गाळयामध्ये वाळवी व उंदीरांचा सुळसुळाट यामुळे संक्रमण शिबिरात राहणाऱ्या हजारो भाडेकरुंची मुळ कागदपत्रे नष्ट झाल्याची माहिती उघ्रड होणे, संक्रमण शिबिरातील मुळ भाडेकरुंना पुनर्वसित इमारतीत किंवा मास्टर लिस्ट अंतर्गत कायमस्वरुपी घरे देताना कोणतेही अडथळे येऊ नये याकरिता मुळ इमारत रिकामी करताना दुरुस्ती मंडळाकडे जमा केलेली कागदपत्रे संक्रमण शिबिरातील रहिवाश्यांना नवीन इमारतीत घर देण्यासाठी महत्वपूर्ण मुळ दस्तऐवज ग्राह्य धरले जात असल्याने मुळ दस्तऐवजच नष्ट झाल्याने भाडेकरुंना मुळ कागदपत्र अभावी नवीन इमारतीत मिळणाऱ्या घरापासून वंचित रहावे लागण्याचा निर्माण झालेला धोका, एकंदरितच भाडेकरुंची कागदपत्रांची जतन करणे हे मुंबई इमारत दु व पु. मंडळाची जबाबदारी असतानाही याकडे दुर्लक्ष केल्यामुळे मुळ दस्ताऐवज नष्ट झाल्याचा प्रकार घडणे, यासंदर्भात सदर प्रकरणाची चौकशी करुन मुळ दस्तावेज खराब होऊन नष्ट होण्यासाठी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | २९८ | १०० | मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी राज्य सरकारने करार केलेल्या आणि कार्यादेशही प्राप्त झालेल्या खाजगी विकासकाने घरे तयार झालेली नसतानाही कामगारांकडून संमती पत्रासहीत सोडतीशिवाय घरे वितरण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, राज्य शासनाने मुंबई महानगरप्रदेशात गिरणी कामगारांना वांगणी येथील ५१ हजार तर शेलू येथील ३० हजार घरांच्या बांधकामासाठी चड्डा डेव्हलपर्स आणि प्रमोटर्स आणि कर्मयोगी एव्हीपी रियालिटी या कंपनीच्या विकासकांना कंत्राट व कार्यादेश देण्यात येणे. सदरहू प्रकरणी घरे तयार नसतानाही घरे लागल्याचे सांगून त्यांची कागदपत्रे घेऊन कार्यालयात बोलावून त्यांच्याकडून पाच हजार रुपये घेऊन गिरणी कामगारांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार घडणे. सदरहू प्रकरणात गिरणी कामगारांना घरे बांधण्यासाठी कंत्राट दिलेल्या विकासकानी आतापर्यंत राज्यात एकही गृहप्रकल्प राबविला नसतानाही या विकासकाला पंतप्रधान आवास योजनेच्या नावाखाली शासनाने बिनव्याजी ४०० कोटी रुपये कर्ज देण्याचा घेतलेला धक्कादायक निर्णय. सदरहू रक्कम शासनाने महाराष्ट्र निवारा निधितून रक्कम देण्याच्या प्रस्तावास तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी मंजूरी देण्यात येणे. सदरहू प्रकरणात घरांचे बांधकाम झाले नसतानाही वितरण करुन व प्रत्येक कामगारांकडून पाच हजार रुपये घेऊन आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | व यामध्ये विकासकास झुकते माप दिल्याप्रकरणाची चौकशी करुन याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ३०० | १०० | म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासात अतिरिक्त चटई क्षेत्रफळाचा लाभ घेणाऱ्या विकासकांना ठराविक चटई क्षेत्रफळ सदनिकांच्या स्वरुपात म्हाडा कायद्यानुसार म्हाडाला सुपूर्द करणे बंधनकारक असतानाही विकासकाने ४५९ प्रकल्पात १ लाख ४९ हजार ८०८ चौ.मी. अतिरिक्त चटई क्षेत्रफळ म्हाडाकडे ऑक्टोबर २०१७ पर्यंत सुपूर्द होणे आवश्यक असतानाही अतापर्यंत ४६० प्रकल्पात ८४ हजार ७४ चौ.मी. इतके अतिरिक्त चटई क्षेत्रफळ अद्यापही सदनिकांच्या स्वरुपात विकासकांनी म्हाडाला सुपूर्द केला नसल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास आला. याबाबत शासनाने कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ३०१ | १०० | मुंबईतील माझगांव म्हातारपाखाडी, गणपावडर रोड, सीएसक्र.३०९ मधील इमारत, क्र.३६/४०, अहमद बिल्डिंग या इमारतीचा मिळकत भाडे करार संपुष्टात आला असतानाही व सदरहू मिळकत शासनाच्या ताब्यात असतानाही मालमत्ता प्रमाणपत्रावर नावाची कोणतीही अधिकृत नोंद नसलेल्या व्हेलेंशिया ग्रुप ऑफ कंपनीचे विकासक इंब्राहीम मोमीन यांना म्हाडाचे मुंबई दु. व पु. मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी कलम ७९-अ अंतर्गत पुनर्विकास करण्याबाबत बेकायदा नोटीस पाठविल्याचा प्रकार उघडकीस येणे, यासंदर्भात सदरहू मिळकत आणि इमारतीची गेली ५० वर्षापासून स्वखर्चाने दुरुस्त व देखभाल करणाऱ्या नियोजित अहमद बिल्डिंग टेनन्टस् को.ऑप.हौ.सोसायटी या इमारतीच्या रहिवाश्यांनी मुख्य अधिकारी, म्हाडा यांना जानेवारी २०२३ मध्ये पत्र पाठवून त्यामध्ये सदरहू मिळकतीचे मालक व्हेलेंशिया ग्रुप ऑफ कंपनी नसून ते मिळकतीचे अधिकृत मालक नाहीत यामुळे सदरहू इमारतीचा कलम ७९-अ अंतर्गत पुनर्विकास करण्यासाठी इमारतीच्या बोगस मालका दिलेले पत्र रदद् करुन इमारतीच्या नियोजित संस्थेला पुनर्विकास करण्यासाठी पत्र पाठविण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ६२८ | १०० | मुंबईतील इमारत क्र.१२६-१३२, थॉवर मेन्शन नं.२, शिवदाक चापशी मार्ग, नुरबाग, मुंबई-९ या इमारतीचा पुनर्विकास प्रकल्प दि नेक्श्ट जैन या विकासकातर्फे राबविण्यात येत असून सदरहू इमारतीचा रस्त्यालगतचा काही भाग महापालिकेच्या हॅकॉक ब्रीजसाठी रस्ता रुंदीकरणात जात असल्याने महापालिकेने या इमारतीच्या पुनर्वसनाची जबाबदारी घेणे आवश्यक असताना, तसेच महापालिकेने इमारत रिक्त करण्याबाबत रहिवाश्यांना कोणतीही नोटीस दिली नसणे, म्हाडा, मुख्याधिकारी, इमारत दु. व पु. मंडळ तथा कार्यकारी अभियंता, ई-१, काळाचौकी, मुंबई यांच्यातर्फे कोणतीही पुनर्वसनाची प्रक्रिया न करता इमारत खाली करणेबाबत ७५ रहिवाश्यांवर विकासकाच्या सांगण्यावरून तसेच त्यांच्याशी आर्थिक संगनमत करुन इमारत खाली करण्यासाठी सक्ती करण्यात येत आहे. महानगरपालिका व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | म्हाडा यांच्यात समन्वय नसल्यामुळे म्हाडा परस्पर विकासकाच्या माध्यमातून रहिवाश्यांना इमारत खाली करण्यास जबरदस्ती करण्यात येत आहे. शासनाच्या नियमानुसार त्याच परिसरात संक्रमण शिबिराची पर्यायी व्यवस्था म्हाडा तथा विकासकाने करुन देणे आवश्यक असल्याने इमारतीतील रहिवाश्यांना त्याच परिसरात पर्यायी व्यवस्था करण्यासाठी शासनाने कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनील राऊत** |
| (१३) | २१४ | १०० | विक्रोळी (पूर्व ) मौजे हरियाली, टागोर नगर या म्हाडा भू अभिन्यासातील इमारत क्र.५४ व ४१२ मधील न.भू.क्र २९५ इमारत क्र ५४ व ४१२ मधील बौध्दविहारालगतच्या म्हाडा भूखंडावर श्री निल्सल सालियन, जॉय सालियन ,निल सालीयन ,मरीन शैला सालियन यांनी अतिक्रमण करुन बार व रेस्टॉरंट (Coastal Tawa ) च्या नावांने व्यवसाय सुरु आहेत उक्त बार रेस्टॉरंन्टसाठी म्हाडाने परवानगी दिली आहे उक्त विक्रोळी (पूर्व ) मौजे हरियाली, टागोर नगर या म्हाडा भू अभिन्यासातील इमारत क्र.५४ व ४१२ मधील न.भू.क्र २९५ इमारत क्र ५४ व ४१२ मधील बौध्दविहारालगतच्या म्हाडा भूखंडावर श्री निल्सल सालियन, जॉय सालियन ,निल सालीयन , मरीन शैला सालियन यांनी अतिक्रमण करुन सुरु केलेला बार व रेस्टॉरंट तात्काळ निष्कासित करण्याबाबत लोकप्रतिनिधिनी दिनांक २४.१२.२०२४ रोजी मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,वांद्रे पूर्व मुंबई यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली असणे, याबाबत शासनाने करावायची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | २१७ | १०० | विक्रोळी येथील कन्नमवार नगर -२ संक्रमण शिबिरातील इमारतीच्या आवारात जे गाळेधारक आहेत त्यांना इमारतीच्या तळमजल्याला ८ ते १० हजार स्केअर फूट प्रमाणे गाळेधारकांना गाळे देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दि २९.१.२०२५ रोजी वा त्या दरम्यान मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महा.गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा )बांद्रा, मुंबई यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे उक्त २०० ते २५० गाळेधारकाकडे म्हाडाकडील फोटोपास, सर्व्हे पावती,त्याच्याकडून शासनाचा महसूल वसुल केला जाणे, आदि शासकिय पुरावे असतांनाही गाळेधारकांना गाळे देण्यास विकासकाकडून टाळाटाळ होत असणे, संक्रमण शिबिर इमारतीमधील लोकांना ज्या निकषाप्रमाणे सदनिका देण्यात आल्या त्याच निकषाच्या धर्तीवर गाळे धारकांना गाळे देण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | २१८ | १०० | विक्रोळी (पूर्व ) मुंबई टागोर नगर येथील वसाहत क्रमांक ४११ धोकादायक अवस्थेत असलेल्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील सज्जा कोसळल्याची घटना दि १९ डिसेंबर,२०२४ वा त्या सुमारास घडली आहे, गत १६ वर्षापासून टागोर नगर येथील वसाहतीतील ७ इमारतींचा पुनर्विकास रखडला असल्याने घरातील छताचा भाग कोसळण्याच्या घटना वारंवार घडत असतानादेखील तब्बल ९९४ कुटुंबे जीव मुठीत घेऊन वास्तव्य करीत आहेत, उक्त वसाहतीतील इमारतीची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शासनाने पाहणी करणाची आवश्यकता टागोरनगर वसाहतीतील धोकादायक इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१६) | १९१ | १० | राज्यशासनाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी विकासक शिवशक्ती पुनर्वसन प्रकल्प मर्यादीत या कंपनीला कायमस्वरुपी संक्रमण सदनिका खाजगी विकासकांना मासिक भाडेतत्वार सदनिका दिल्या असणे, मासिक भाडयाची एकूण रक्कम रुपये ८६.५२ कोटी इतकी रक्कम थकीत असणे, भाडयाची रक्कम तातडीने वसूल करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, शिवशक्ती पुनर्वसन प्रकल्प लि. कंपनी या मार्फत कोणतीच कार्यवाही करण्यात येत नसणे, भाडे वसूली करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | १९३ | १० | धारावी, माहिम, मुंबई येथील धारावी पुनर्वसन प्रकल्प आक्सा व मालवणी गावा मध्ये राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, धारावी पुनर्विकास प्रकल्पातील अपात्र झोपडीधारकांसाठी आक्सा व मालवणी मध्ये जागा देण्याचा निर्णय झाला असणे, आक्सा व मालवणी परिसरातील १४० एकर जमीन देण्यचा निर्णय घेतला असणे, तथापि उपरोक्त निर्णयाच्या विरोधात स्थानिक रहिवाशांनी व परिसरातील नागरिकांनी सदरच्या निर्णयास तीव्र विरोध केला असणे, पुनर्वसन प्रकलपाला विरोध करण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी दि. २२ ऑक्टो.२०२४ रोजी वा त्यासुमारास वारंवार बैठका घेतल्या असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | १९५ | १० | माता रमाबाई आंबेडकर नगर, घाटकोपर , मुंबई येथील नगराचा पुनर्विकास करणे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वास्तुशास्त्रज्ञ आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएट्स कंपनीची सल्लागार म्हणून नियुक्ती केली असणे, मात्र अद्याप पुनर्विकासाचे काम सुरु झाले नसणे, पुनर्विकास प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार केला नसणे, पुनर्विकास कामात दिरंगाई होत असणे, माता रमाबाई आंबेडकर नगर ३३.१५ हेक्टर जागेवर वसले असणे, सदरच्या ठिकाणी १६ हजार ७५७ झोपडया असणे, मोठा प्रकल्प असूनही शासनाने नियोजीत प्रकल्प आराखडा तयार केला नसणे, तातडीने प्रकल्पाचे काम सुरु करणे, निविदा प्रक्रिया पूर्ण करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१९) | १९८ | १० | विकासक मेसर्स दत्तानी कन्स्ट्रक्शन (कालिंदी) डेव्हलपर्स या विकासकांनी २२९ झोपडीधारकांना देवी कन्या कुमारी एस.आर.अे.सहकारी गृहनिर्माण सोसायटी लि.गोरेगांव (पश्चिम), मुंबई येथील इमारतीत गत १५ वर्षापूर्वीच सदनिका दिल्या असणे, मात्र सदरच्या झोपडीधारकाची अद्याप पात्रता/अपात्रता निश्चित झाली नसणे, पात्र/अपात्र निश्चित करण्याची अवश्यकता निर्माण झाली असणे, या संदर्भात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | देवी कन्या कुमारी एस.आर.अे. सहकारी गृहनिर्माण सोसयाटी लि.गोरेगाव पश्चिम, मुंबई व स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री, मा. गृहनिर्माण मंत्री, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांच्याकडे दिनांक २० नोव्हेंबर,२०२३ रोजी मागणी केली असणे, तथापि त्याकडे दुर्लक्ष केले असणे, पात्रता/अपात्रता निश्चित करण्यासंदर्भात सक्षम अधिकारी-६, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रा पूर्व, मुंबई यांनी दि.१२ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास झोपडीधारकांचे सर्वेक्षण केले असणे, सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असणे, मात्र अद्याप पुरवणी परिशिष्ट-२ ची यादि संबंधित झोपडीधारकांना दिली नसणे, संबंधित अधिकारी परिशिष्ट-२ ची यादि देण्यास टाळाटाळ करीत असणे, विकासकाचे व संबंधित अधिकाऱ्यांचे संगनमत असणे, पात्रता/अपात्रता निश्चित झाली नसल्यामुळे झोपडीधारकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, परिशिष्ट-२ ची यादि देण्यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | ६३८ | १० | अजमेरा रियालटी ॲन्ड इन्फ्रा इंडिया लि. या विकासक कंपनीने अस्कोट सहकारी गृहनिर्माण या संस्थाला संस्थेचा पुनर्विकास शास्त्री नगर, अंधेरी (पश्चिम) मुंबई येथे करण्याचे ठरविले असणे, या प्रकल्पासाठी अंदाजे ३२० कोटी खर्च येणार असणे व विकासकाला ७१,३०० चौ.फू.कारपेट क्षेत्रफळ मिळणार असणे, विकासक सदरच्या सभासदांना चटई क्षेत्र निर्देशांक कमी देत असणे, अस्कोट सहकारी गृहनिर्माण संस्थेवर मोठया प्रमाणावर दबाव टाकला जात असणे, संस्थेवर बळजबरी केली जात असल्याने सभासद तयार झाले असणे, संस्थेच्या सभासदानी विरोध केला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २० मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) गृहनिर्माण विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.